| | | सुनावणीचा दि.03.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 358/2022 | श्री. दीपक शामराव वाघमारे, रा. घर नं. 1-21-509, जयभीमनगर टाऊन हॉल छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, पैठण गेट जवळ मनपा कॉम्पलेक्स छत्रपती संभाजीनगर | |
| 2 | 359/2022 | श्री. दीपक शामराव वाघमारे, रा. घर नं. 1-21-509, जयभीमनगर टाऊन हॉल छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, पैठण गेट जवळ मनपा कॉम्पलेक्स छत्रपती संभाजीनगर | |
| 3 | 360/2022 | श्री. दीपक शामराव वाघमारे, रा. घर नं. 1-21-509, जयभीमनगर टाऊन हॉल छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, पैठण गेट जवळ मनपा कॉम्पलेक्स छत्रपती संभाजीनगर | |
| 4 | 361/2022 | श्री. दीपक शामराव वाघमारे, रा. घर नं. 1-21-509, जयभीमनगर टाऊन हॉल छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, पैठण गेट जवळ मनपा कॉम्पलेक्स छत्रपती संभाजीनगर | |
| 5 | 362/2022 | श्री. दीपक शामराव वाघमारे, रा. घर नं. 1-21-509, जयभीमनगर टाऊन हॉल छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, पैठण गेट जवळ मनपा कॉम्पलेक्स छत्रपती संभाजीनगर | |
| 6 | 1127/2022 | श्री. अहमद खान करीम खान, रा. विद्यापीठ गेट जवळ पाण्याच्या टाकीमागे जुना कुतुबपुरा छत्रपती संभाजीनगर | पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, पैठण गेट जवळ मनपा कॉम्पलेक्स छत्रपती संभाजीनगर | |
| 7 | 1781/2022 | श्री. रऊफ एन.पटेल, रा. ई-103/06, शिवाजीनगर, गारखेडा परिसर छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | |
| 8 | 1786/2022 | श्री. मनोज संपत गडकर, रा. रो-हाऊस नं. 71, हरीरामनगर सुर्या लॉन्ससमोर, बीड बायपास रोड छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, दुसरा मजला, लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठणगेट छत्रपती संभाजीनगर | |
| 9 | 1577/2022 | श्री. अनिल जनार्धन पांडे, रा. ए-5/6, गादिया विहार, दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर, छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपआयुक्त परिमंडळ-1, 2 रा मजला लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठण गेट छत्रपती संभाजीनगर | |
| 10 | 1578/2022 | श्री. बन्सी सखाराम शेजवळ, रा. घर नं. ई 16/01, एन-6 सिडको, छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) शहर, छत्रपती संभाजीनगर | पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.03.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 1462/ 2022 | श्री. विश्वास देविदास नवपुते, रा. चिकलठाणा सुतारवाडा ता. जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर | अपर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर | |
| 12 | 1500/ 2022 | श्री. अहमद खान करीम खान, रा. पाण्याच्या टाकी जवळ विद्यपीठ गेट जवळ, कुमुबपुरा छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर, छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपआयुक्त परिमंडळ-1, 2 रा मजला लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठण गेट छत्रपती संभाजीनगर | |
| 13 | 2903/ 2022 | श्री. चांद गुलाब पटेल, मु. रुस्तुमपुरा पो. भाकरवाडी ता. बदनापुर जि. जालना | पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर | |
| 14 | 2954/ 2022 | श्री. अबदुल राऊफ दाऊद मरचड, रा. सी/5804, छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह हर्सुल छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ.छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह हर्सुल छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ.छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह हर्सुल छत्रपती संभाजीनगर | |
| 15 | 3039/ 2022 | श्री. गजानन आत्माराम तुपे, रा. पो.अ./29, पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, 2 रा मजला, लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठण गेट छत्रपती संभाजीनगर | |
| 16 | 3804 A/20 23 | श्री. नरेश मोकाटे, रा. घर क्र. 857, वार्ड नंबर 05, गल्ली नंबर 04, पेन्शनपुरा, सुभाषपेठ कॅन्टोन्मेंठ, छत्रपती संभाजीनगर-431002 | सहाय्यक पोलीस आयुक्त छावणी छत्रपती संभाजीनगर | पोलीस उप आयुक्त परिमंडळ-1, 2 रा मजला, लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठण गेट, छत्रपती संभाजीनगर | |
| 17 | 5851/ 2023 | श्री. रमेश गोपलराव लिंगायत, रा. घर नबंर 308, छवणी छत्रपती संभाजीनगर | सहा. पोलीस आयुक्त, शहर विभाग, छत्रपती संभाजीनगर | पोलीस उप आयुक्त परिमंडळ-1, 2 रा मजला, लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठण गेट छत्रपती संभाजीनगर | |
| 18 | 2481/ 2022 | श्री. हिवराळे चंद्रकांत सांडुजी, रा. आनंद नगर, साठे नगर नारेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त सिडको, सोनामाता शाळेजवळ, छत्रपती संभाजीनगर | पोलीस उप आयुक्त परिमंडळ-2, संभाजी कॉलनी, एन-6, सिडको सेंट्रल जकात नका जवळ, छत्रपती संभाजीनगर | |
| 19 | 2305/ 2022 | श्री. हाफिज खान अजीम खान, रा. अबीसी ड्रायक्लीनर्स जवळ, नुतन कॉलनी, पेन्शनपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग छत्रपती संभाजीनगर | पोलीस उप आयुक्त परिमंडळ-1, लोकमान्य बाळगंगाधर टिळक व्यापारी संकुल पैठण गेट छत्रपती संभाजीनगर | |
| 20 | 2337/ 2022 | श्री. सय्यद अनीस सय्यद सुलेमान, रा. सेन्ट्रल बसस्टॅण्ड, छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर | कारागृह निरीक्षक, छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृह, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.03.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 1119/2022 | श्री. मनोज आनंद पालटे, ईमेल Sanmeet 1981 @ yahoo.com | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन करमाड ता. जि. छत्रपती संभाजीनगर<br>ND | पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय ग्रामीण टीव्ही सेंटर छत्रपती संभाजीनगर | |
| 22 | 1329/2022 | श्री. सत्संगराज भिवराज सोनवणे, रा. नुर कॉलनी हेड पोस्ट ऑफिस सामोर छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर<br>ND | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 23 | 1667/2022 | श्री. सुर्यभान कडुबा साबळे, रा. दिक्षाभुमिनगर हर्सुल छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन फुलब्री ता. फुलब्री जि. छत्रपती संभाजीनगर<br>ND | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग ग्रामीण छत्रपती संभाजीनगर पोलीस अधिक्षक कार्यालयाजवळ,टि.व्ही. सेंटर जवळ एन-10 सिडको, छत्रपती संभाजीनगर | |
| 24 | 2192/2022 | श्री. जगन्नाथ विनायक पवार, रा.चापानेर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर<br>ND | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 25 | 52/2022 | श्री. सोमनाथ येडु मनाळ, रा. शिवाजी महाले चौक योगेश्वरी शाळेजवळ, गट नं. 86, प्लॉट नं. 65 वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग नाहदी पेट्रोलपंपसमोर, गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 26 | 260/2022 | श्री. संतोष माधवराव मोरे, रा. UT. NO. 9/2022, नविन 16 सर्कल मध्यवर्ती कारागृह हर्सुल छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग नाहदी पेट्रोलपंपसमोर, गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 27 | 1699/2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 28 | 1700/2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 29 | 1701/2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 30 | 1702/2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.03.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 1703/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 32 | 1704/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 33 | 1705/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 34 | 1706/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 35 | 1707/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 36 | 1708/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 37 | 1709/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 38 | 1710/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 39 | 1711/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 40 | 1712/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.03.04.2024 | | वेळ दुपारी ३.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 1713/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 42 | 1714/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 43 | 1715/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 44 | 1716/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 45 | 1717/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 46 | 1718/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 47 | 1719/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 48 | 1720/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 49 | 1721/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 50 | 1722/ 2022 | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे, रा. जामगाव पो. रघुनाथनगर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. १ ते ५ | द्वितीय अपील क्रं. ३५८ ते ३६२ /२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. दिपक शामराव वाघमारे<br>रा. घर क्रं. १-२१-५०९ जयभीमनगर टाऊन हॉल,<br>ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १७.१.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये ०५ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाइन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक माहिती अर्जान्वये खालील प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्रं. | अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|---|
| १ | ३५८/२०२२ | ०८.११.२०२१ | श्री.व्ही. बी. कापसे यांच्याकडे असलेला अर्ज दि. १४.६.२०२१ रोजी दिलेल्या नावे मायाबाई वाघमारे हया अर्जातील चौकशी अहवाल तसेच जबाबाच्या नकाला मिळणे बाबत |
| २ | ३५९/२०२२ | ०८.११.२०२१ | वरील प्रमाणे |
| ३ | ३६०/२०२२ | ०८.११.२०२१ | वरील प्रमाणे |
| ४ | ३६१/२०२२ | ०८.११.२०२१ | वरील प्रमाणे |
| ५ | ३६२/२०२२ | ०८.११.२०२१ | वरील प्रमाणे |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली परिपुर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी एकुण ०५ माहितीचे अर्ज सादर करुन १५ गैरअर्जदार लोकांचे जबाबची मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी सदर अर्जाचे चौकशीमध्ये चौकशी अमंलदार यांनी ०३ गैरअर्जदारांचे जबाब नोंदविले व चौकशी करुन सदर अर्ज दप्तरी फाईल केले असून सदर ०३ जबाब व चौकशी अहवाल अपिलार्थी यांना देण्यात आलेले असून उर्वरित गैरअर्जदारांचे जबाब नोंदविलेले नसल्याने ते अभिलेखावर उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १९.११.२०२१ रोजी उत्तर देऊन ०३ जबाब व चौकशी अहवाल देण्यात येत असुन उर्वरित गैरअर्जदारांचे जबाब चौकशी अमंलदार यांनी नोंदविलेले नसल्याने ते अभिलेखावर उपलब्ध नाही असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक १३.१२.२०२१ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०५ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्र./३५८ते ३६२/२०२३/ 8201 दि. 9/5/24

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६ | द्वितीय अपील क्रं. ११२७/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अहमद खान करीम खान<br>रा. विद्यापीठ गेट पाण्याच्या टाकीमागे, कुतुबपुरा<br>ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २५.१.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सोबत जोडलेल्या दस्तऐवजाच्या अनुषंगाने झालेल्या कारवाईचा अहवाल याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी चुकीची दिलेली आहे. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना दप्तरी फाईल केल्याचा रिपोर्ट देण्यात आलेला आहे. तसेच माहिती अर्जातील उर्वरित मुद्दे प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्याने विश्लेषण करुन माहिती देता येणार नाही असे अपिलार्थी यांना दि. २३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११.१.२०२१ रोजी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. आजरोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना समक्ष माहिती दिली असल्याचे आयोगास अवगत केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात

अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./११२७/२०२२/ 8202 दि. 9/5/24

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७ | द्वितीय अपील क्रं. १७८१/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रऊफ एन. पटेल<br>रा. ई-१०३/०६ शिवाजीनगर, गारखेडा परिसर,<br>ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १७.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २७.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांचे अंगरक्षक बलराम खमाट यांच्या वाहनाच्या चौकशी बाबत. जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी चौकशी संदर्भातील प्रकरणाची माहिती मागविली असल्याने अपिलार्थीस माहिती नाकारण्यात आलेली असुन सदर चौकशी प्रकरणी निर्णय अंतिम झालेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी चौकशी संदर्भातील प्रकरणाची माहिती मागविली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती नाकारण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. आजरोजी सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी चौकशीचा निर्णय अदयाप अंतिम झालेला नसल्याचे आयोगास अवगत केले असल्याने अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८(१)(ज) नुसार माहिती देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या माहिती संदर्भातील चौकशी प्रकरणाची अदयावत सद्यस्थिती अपिलार्थी यांना कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१७८१/२०२२ / 8203 दि. 9/5/24

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ८ | द्वितीय अपील क्रं. १७८६/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. मनोज संपत गडकर<br>रा. रो हाऊस नं. ७१ हरिरामनगर सुर्या लॉन्ससमोर, बीड बायपास रोड, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त,<br>परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १७.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १५.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये जनार्धन संभाजी म्हस्के, राहूल जनार्दन म्हस्के, रतन आसाराम वाघ, मंगल रतन वाघ यांचे विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यासाठी मंजुरी दिल्या प्रस्तावाच्या ऐवजाच्या प्रती याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहिती मधील पोलीस खात्याअंतर्गतची बात असुन सदर माहिती देता येणार नाही तसेच सदर अर्जात चौकशी पुर्ण झालेली नसल्याने माहिती पुरविता येवू शकली नाही असे अपिलार्थी यांना दि. ८.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद माहिती संदर्भातील प्रकरणाची अद्ययावत सद्यस्थिती कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१७८६/२०२२ /8204 दि. 9/5/24

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ९ | द्वितीय अपील क्रं. १५७७/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अनील जनार्धन पांडे<br>रा. ए-५/६ गादिया विहार, दर्गारोड, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १०.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २२.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये श्री.राजेंद्र जगन्नाथ पाटील मुख्याध्यापक यांचे विरुध्द पोलीस स्टेशन वेदांतनगर, शहर तक्रारअर्ज दि. १०.८.२०२१ दाखल झाला त्याअनुषंगाने कागदपत्र व संचिका याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाची माहिती मागविली असल्याने कलम ८(१) (त्र) अन्वये माहिती नाकरण्यात आलेली असुन तसे अपिलार्थी यांना दि. ३०.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक २०.१२.२०२१ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१५७७/२०२२ / 8205 दि. 9/5/24

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. १० | द्वितीय अपील क्रं. १५७८/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बन्सी सखाराम शेजवळ<br>रा. घर नं. ई १६/०१ एन-६ सिडको, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्याल)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १०.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी (प्रतिनिधी),जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये क. श्रे. लिपीक या पदाची कालबध्द पदोन्नती बाबत. जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दिनांक १३.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०.११.२०२१ रोजी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश दिलेले आहेत. आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांना माहिती मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या

जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१५७८/२०२२ | 8206 दि. 9|5|24

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ११ | द्वितीय अपील क्रं. १४६२/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विश्वास देविदास नवपुते<br>रा. चिकलठाणा सुतारवाडा ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २७.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये गंगापुर कार्यालय सबरजिस्टार लाटे गंगापुर तहसिलदार अविनाश शिंगटे, पैठण तहसिलदार चंद्रकांत शेळके यांच्यावर लाचलूचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांनी केलेल्या कारवाईचा अहवाल याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थपक्षाशी संबंधित माहिती मागविली असल्याने अधिनियमाचे कलम ८ (१)(ज)(छ)(त्र) अन्वये माहिती नाकारण्यात आली असुन तसे अपिलार्थीस दिनांक ३०.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ३१.१.२०२२ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१४६२/२०२२ | 8207 दि. 9/5/24

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. १२ | द्वितीय अपील क्रं. १५००/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अहमद खान करीम खान रा. विद्यापीठ गेट पाण्याच्या टाकीमागे, कुतुबपुरा ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये उपरोक्त विषयान्वये देण्यात आलेल्या तक्रारीत नमूद मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करण्याची विनंती केली होती अन्यथा उपोषणाची परवानगी मागितली होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहिती मध्ये पोलीस स्टेशन बेगमपुरा अभिलेख पाहता अभिलेखावर नोंद नाही माहिती निरंक आहे असे अपिलार्थी यांना दि. १८.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ११.१.२०२२ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१५००/२०२२ | 8208 दि. 9/5/24

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. १३ | द्वितीय अपील क्रं. २९०३/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. चाँद गुलाब पटेल,<br>रा. रुस्तुमपुरा पो. भाकरवाडी<br>ता. बदनापुर जि. जालना | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्रं.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्रं.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २३.३.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.१.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये हिना चाँद पटेल यांना दि. ०३.९.२०१९ जाहिरातीतील नमुद बाबीनुसार भरती प्रक्रियेतुन का वगळले याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, मागणी केलेली माहिती न देता दिशाभुल करणारी माहिती दिली आहे. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०४.२.२०२२ रोजी उत्तर देऊन माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.३.२०२२ रोजी सुनावणी घेतलेली आहे.

आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती न देता विना स्वाक्षरी असलेली नोटीस तसेच जाणूनबजुन दुसरीच जाहिरातीची माहिती दिली असल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्याल, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी परिपुर्ण माहिती कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसेल किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसेल तर तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्र./२९०३/२०२२/8209 दि. 9/5/24

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. १५ | द्वितीय अपील क्रं. ३०३९/२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन आत्माराम तुपे<br>रा. पो.अ./२९ पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,<br>परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३१.३.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी उशिराने उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २२.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये गु.र.न. २२९/२०१७ पो. स्टे. छावणी मध्ये श्रीमती ललीता राजू अंभोरे व तुषार राजू अंभोरे यांना बोलावून त्यांची चौकशी करुन त्यांचे जबाब घेतले आहे त्यांचे जबाबाचे प्रत याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १५.१२.२०२१ रोजी उत्तर देऊन सदर प्रकरणी मा. न्यायालयात दोषारोप दाखल केलेले असुन आपणास हवी असलेली माहिती मा. न्यायालयातुन हस्तगत करावी असे अपिलार्थीस कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ०३.१.२०२२ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३०३९/२०२२ / 8210 दि. 9/5/24

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. १६ | द्वितीय अपील क्रं. ३८०४/ए/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नरेश मोकाटे,<br>रा. घर क्रं. ८५७ वार्ड नं. ५ गल्ली नं. ०४ पेन्शनपुरा, सुभाषपेठ कॅन्टोमेंट ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २०.६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट अपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी ऑनलाईन माहिती अर्जान्वये दिनांक १.१.२०२१ ते २४.२.२०२२ पावेतो पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे ईमेल व पोस्टाद्वारे दिलेल्या तक्रारी अर्जात झालेल्या कार्यवाहीची माहिती याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांचे इमेलवर मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०६.५.२०२२ रोजी उत्तर देऊन माहितीचे एकुण १० पृष्ठ विनामुल्य देण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.५.२०२२ रोजी सुनावणी घेऊन

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली नसल्याचे आयोगास अवगत केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे पुनश्च उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३८०४/ए/२०२३ 1821 दि. 9/5/24

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. १७ | द्वितीय अपील क्रं. ५८५१/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रमेश गोपालराव लिंगायत<br>रा. घर नं.३०८ छावणी, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्रं.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्रं.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.५.२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि. ११.५.२०२२ रोजी दिलेला अर्ज व दि. २१.९.२०२१ रोजी दिलेले अर्ज व दिनांक ७.१०.२०२१ रोजी दिलेले अर्ज यांच्या प्रत याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या मागणीप्रमाणे दि. २०.९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०६.६.२०२३ रोजी उत्तर देऊन माहिती देण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना पुर्ण माहिती दिलेली नसल्याचे दिसुन येत असल्याने सात दिवसात पुर्ण माहिती देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. त्यानुसार दि. २०.९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे दिसुन येत आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी यांनी केलेली असल्याचे दिसुन असल्याने अपील निकाली काढण्याचा निष्कर्षप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्रं./द्वि.अ.क्रं./५८५१/२०२३ / 8212 दि. 9/5/24

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. १९ | द्वितीय अपील क्रं. २३०५/२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हाफीज खान अजीम खान, रा. एबीसी ड्रायक्लीनर्स जवळ नुतन कॉलनी, पेन्शनपुरा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, सिटीचौक छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.३.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मी दि. ३१.१२.२०२० रोजी क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती पोलीस स्टेशन क्रांतीचौक अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २६.११.२०२१ रोजी उत्तर देऊन मागणी केलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक १३.१२.२०२१ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२३०५/२०२२ / 8213 दि. 9/5/24

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

---

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २५ | द्वितीय अपील क्रं. ५२/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सोमनाथ येडु मनाळ,<br>रा. जिवाजी महाले चौक योगेश्वरी शाळेजवळ गट नं. ८६ प्लॉट नं. ६५ वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगापूर<br>ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०५.१.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २०.९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये आपल्या पोलीस ठाण्यात चारित्र्य पडताळणीसाठी आलेले एकुण अर्ज व त्यावर झालेली कारवाई याचा अहवाल देण्यात यावा याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाची गोपनीय स्वरुपाची असल्याने माहिती देता येणार नाही असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२.११.२०२१ रोजी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अंशतः मंजुर केलेले आहे. आजरोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळालेली नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना केवळ पोलीस ठाण्यात चारित्र्य पडताळणीसाठी आलेले एकुण अर्जाची संख्यात्मक माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगापूर जि. छत्रपती संभाजी नगर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्र./५२/२०२२ /8214 दि. 9/5/24

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. २६ | द्वितीय अपील क्रं. २६०/२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संतोष माधवराव मोरे, युटी नं. ९/२०२२ नवीन १६ सर्कल मध्यवर्ती कारागृह हर्सुल, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १४.१.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये संतोष मोरे यांच्या विरोधात गंगापुर पोलीस स्टेशन येथे दाखल झालेला गुन्हाक्रं. २७/२०१६ या गुन्हयात दैनंदिनी तपशिल रजिस्टर मधील नोंदी याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती गोपनीय असल्याने अधिनियमाचे कलम ८ (ज) नुसार माहिती नाकारण्यात आलेली आहे व तसे अपिलार्थी यांना दि. २४.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिनांक ०५.१.२०२२ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२६०/२०२२ | ४२४५ दि. ९/५/२४

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २७ ते ५० | द्वितीय अपील क्रं. १६९९ ते १७२२ /२०२२ (एकुण २४) |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाळासाहेब भास्कर बनसोडे<br>रा. जामगाव पो. रघुनाथनगर<br>ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक<br>पोलीस स्टेशन, गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, गंगापूर<br>ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( ऑनलाईन सुनावणी दिनांक ०३.०४.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १५.२.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये २४ द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे पोलीस स्टेशन गंगापूर येथील दिनांक ३.१.२०१९ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्रं. | अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|---|
| २७ | १६९९/२०२२ | १७.११.२०२१ | एन. सी. रजिस्टरची प्रत |
| २८ | १७००/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस निरीक्षक लोहकरे यांच्या दौरा रजिस्टरची व टुर डायरीची प्रत |
| २९ | १७०१/२०२२ | १७.११.२०२१ | राज्याचे पोलीस महसंचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी किती वेळा भेटी दिल्या त्याबाबतची प्रती |
| ३० | १७०२/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस अंमलदार व पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द किती तक्रारी प्राप्त झाल्या तक्रारीवरील कारवाई व चौकशी अहवालाची माहिती |
| ३१ | १७०३/२०२२ | १७.११.२०२१ | राज्याचे गृहमंत्री व गृह सचिव यांनी किती वेळा भेटी दिल्या त्याबाबत |
| ३२ | १७०४/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस ठाणे गंगापुर येथील सीसीटीव्ही फुटेज |
| ३३ | १७०५/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस ठाणे गंगापुर मध्ये दाखल गुन्हयामध्ये आरोपीच्या विरोधात न्यायालयामध्ये चार्जशिट दाखल झालेल्या प्रती |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | १७०६/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन मध्ये १ ते ५४४ पर्यंत एकुण किती गुन्हे दाखल झालेले आहेत त्याची बीट निहाय प्रती |
| ३५ | १७०७/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन मध्ये किती तक्रारी प्राप्त झाल्या त्याबाबत प्रती |
| ३६ | १७०८/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन मधील एफआयआर डायरीची प्रती |
| ३७ | १७०९/२०२२ | १७.११.२०२१ | वाळु वाहतुक करणाऱ्या वाहनांवर डंप्पर, हायवा, ट्रॅक्टर या वाहनांवर किती कार्यवाही करण्यात आली व किती गुन्हे दाखल केले प्रती |
| ३८ | १७१०/२०२२ | १७.११.२०२१ | गंगापुर पोलीस स्टेशन येथील वापरात असलेल्या शासकीय वाहनाच्या लॉगबुकच्या प्रती |
| ३९ | १७११/२०२२ | १७.११.२०२१ | गंगापुर पोलीस स्टेशन येथील अधिकारी/कर्मचारी यांनी शासनाला वार्षिक मिळकत अहवाल सादर केलेला आहे त्याच्या प्रती |
| ४० | १७१२/२०२२ | १७.११.२०२१ | पकडलेल्या वाळु साठयाचे लिलाव केलेले आहे त्या लिलावाची माहिती |
| ४१ | १७१३/२०२२ | १७.११.२०२१ | अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या देशी दारु विक्रेत्यावर किती गुन्हे दाखल करणयत आले याबाबत बिटनिहाय प्रती |
| ४२ | १७१४/२०२२ | १७.११.२०२१ | जामगांव ग्रामपंचायत सरपंच बशीर शेख यांनी दि. ३०.१०.२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीची सोबत दिलेल्या सहयाची पानाची प्रती |
| ४३ | १७१५/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन हद्दीत किती ३०२ खुन झालेले आहेत त्याची गुन्हेनिहाय तसेच बीटनिहाय प्रती |
| ४४ | १७१६/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन हद्दीत किती दरोडे पडलेले आहेत व त्या दरोडयाची बीटनिहाय प्रती |
| ४५ | १७१७/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन हद्दीत एकुण किती ३०७ चे गुन्हे दाखल झालेले आहे त्याची बीटनिहाय प्रती |
| ४६ | १७१८/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या सुरु असलेल्या धंदा करणाऱ्यावर आपल्या स्तरावरुन कोणकोणत्या लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत. |
| ४७ | १७१९/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन मध्ये अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या वाहनावर किती गुन्हे दाखल आहेत त्याच्या प्रती |
| ४८ | १७२०/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन मध्ये दिव्यांग व्यक्तीने दिलेल्या तक्रारीवर किती गुन्हे दाखल केलेले आहे व त्या दिव्यांग व्यक्तीचे नावे व गुन्हा दाखल झाल्याची बीट निहाय प्रती |
| ४९ | १७२१/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस स्टेशन मध्ये बलात्काराचे किती गुन्हे दाखल झालेले आहे व किती आरोपीवर कार्यवाही केलेली आहे त्यांच्या प्रती |
| ५० | १७२२/२०२२ | १७.११.२०२१ | पोलीस ठाणे गंगापुर येथील सीसीटीव्ही फुटेज |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापे पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेल्या व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या अभिलेखाचे अवलोकन करणे बाबत अपिलार्थी यांना सुचीत करण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या सर्व प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन निर्णय पारित करताना जन माहिती अधिकारी यांचा प्रतिसाद विचारात घेतलेला आहे. अपिलार्थी यांना सुचीत केल्याप्रमाणे ते माहिती घेण्याकरिता कार्यालयात आले असता त्यांनी काही माहिती दि. १३.१.२०२२ रोजी स्विकारलेली आहे. यानंतर त्यांना उर्वरित माहिती देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी माहितीमध्ये काहीतरी त्रुटी असल्याचा समज करुन माहिती घेण्याकरिता परत येतो असे सांगुन गेले ते आतापर्यंत माहिती घेण्याकरिता कार्यालयात आलेले नाहीत.

अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन देय होणारी माहिती प्रदान करण्यासंदर्भात अनुसरण्यात आलेल्या कार्यवाही बाबतची नोंद स्टेशन डायरी मध्ये घेण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे कारण नमुद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी एकाच दिवशी वेगवेगळया विषयाबाबत २४ माहितीअर्ज केलेले आहेत. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना सर्व अर्जाना ३० दिवसाच्या आत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थी यांनी या पध्दतीने एकाच वेळी एका जन माहिती अधिकारी यांचेकडे मोठया प्रमाणावर माहितीचे अर्ज देऊन माहितीची मागणी करणे ही बाब माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण केल्यासारखी असल्याचे स्पष्ट होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. असे असताना अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना माहिती मिळालेली नाही, असे प्रयोजन नमुद करुन वर नमुद केल्याप्रमाणे २४ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. ही बाब आयोगास संयुक्तीक वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

अपिलार्थी यांची उपरोक्त २४ द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१६९९-१७२२/२०२२ | 8216 दि. 9/5/24